# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.03.2025** **वार-मंगळवार**

---

**परिवहन मंत्री**

येत्या गुढीपाडव्यापासून सुरू होणाऱ्या मराठी नववर्षात राज्य परिवहन विभागामार्फत नोंदणी झालेल्या प्रत्येक व्यावसायिक वाहनावरचे सामाजिक संदेश मराठीत असले पाहिजेत असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. यामुळे मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार होईल. तसेच मराठी भाषेचा योग्य सन्मान राखला जाईल असं सरनाईक यांनी म्हटलं आहे.

**सिंहगड विकास**

किल्ले सिंहगडाच्या विकासासाठी संबंधित सर्व यंत्रणा आणि विभागांचा एकत्रित प्रस्ताव पालकमंत्र्यांच्या संमतीने 15 दिवसात पाठवला जाईल अशी माहिती मंत्री आशिष शेलार यांनी आज विधानसभेत दिली. यासंदर्भातील लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला ते उत्तर देत होते. पुरातत्व विभाग, पर्यटन विभाग, सार्वजनिक बांधकाम, जिल्हाधिकारी कार्यालय, महापालिका अशा सर्व यंत्रणांचा स्थानिक पातळीवरील एकत्रित विकास आराखडा तीन महिन्यात तयार करण्यात येणार असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**पाणी गळती**

पुणे शहरातल्या जुन्या जलवाहिन्यांचे नकाशे शोधून त्याची गळती बंद करण्यासाठी प्रयत्न केला जाईल असं पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी सांगितलं. शहरातील मुख्य जलवाहिन्या जुन्याच असून त्या जमिनीखालून नेमक्या कशा गेल्या आहेत याचे नकाशे उपलब्ध नसल्याचं समोर आलं आहे.
पाण्याची गळती रोखण्यासाठी याचे नकाशे आवश्यक असल्याचं पृथ्वीराज बीपी यांनी स्पष्ट केलं.

**जिल्हा परिषद फेलोशिप**

पुणे जिल्हा परिषदेच्या फेलोशिप योजनेअंतर्गत तरुणांना 11 महिन्यांसाठी प्रत्यक्ष प्रशासनात काम करण्याची संधी मिळणार असून यासाठी 25 विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. या विद्यार्थ्यांना दरमहा 25 हजार रुपये मानधन दिलं जाणार आहे. स्थानिक समस्यांवर प्रभावी उपाय योजना सुचवण्याची जबाबदारी या विद्यार्थ्यांवर असणार आहे.

आरएसएसपीसी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षात प्रत्येक गावापर्यंत आणि घरापर्यंत संपर्क मोहीम राबवण्यात येणार असून ठिकठिकाणी संमेलनं आणि मिळावे आयोजित करण्यात येतील अशी माहिती संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. शताब्दी वर्षात संघ विस्तारासाठी स्व-आधारित व्यवस्था, पर्यावरण, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन आणि नागरी कर्तव्य हे पंच परिवर्तनाचं सूत्र असेल असं जाधव म्हणाले.

कार्यशाळा

पिंपरी चिंचवड शहरातील दुर्गा टेकडीचा पुनर्विकास करण्याचं महानगरपालिकेचं नियोजन असून या अनुषंगानं नागरिकांशी चर्चा करण्यासाठी दुर्गा टेकडी इथं 'दुर्गा टेकडी उद्यान डिझाईन विचारसरणी कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. या विकासकामाबाबात नागरिकांना सूचना देता याव्यात, टेकडीच्या विकासात नागरिकांना अपेक्षित असणाऱ्या गोष्टींवर सविस्तर चर्चा व्हावी, यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सन्मान

पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आल्यानंतर प्रथमच पुण्यात आलेल्या आचार्य श्री नित्यानंदसुरीश्वरजी महाराज यांचं आज ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आलं. शहरातील गोडवाड जैन श्वेताम्बर संघाच्या जैन ट्रस्ट मंडळाच्यावतीनं त्यांना राष्ट्रसंत ही पदवी आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं.

निलंबन

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या एका चालकाला बस चालवताना क्रिकेट सामना पाहिल्यामुळे निलंबित करण्यात आल्याच्या घटनेनंतर, पीएमपीएमएल नं आपल्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी कडक सूचना जारी केल्या आहेत. गाडी चालवताना मोबाईल फोन वापरणे, तंबाखू-पान मसाला सेवन करणे, अशा कारणांसाठी चालकांना आणि वाहकांना निलंबित केले जाऊ शकते, असं या सूचनांमध्ये म्हटलं आहे.

अमली पदार्थ जप्ती

पुणे पोलिसांनी गेल्या वर्षी जप्त केलेले 788 किलो अमली पदार्थ रांजणगाव इथल्या खासगी कंपनीच्या भट्टीत नष्ट केले जाणार आहेत अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. गांजाची छुप्या पद्धतीनं विक्री करणारे विक्रेते, तसंच तस्करांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

क्रीडा

पुण्यात येत्या 8 ते 12 एप्रिल दरम्यान आशिया ओशियाना गट महिलांची "बीली जिन किंग' टेनिस स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत भारतासह न्यूझीलंड, चायनीज तैपई, कोरिया, चीन, हाँगकाँग आणि थायलंड या देशातील महिला खेळाडू सहभागी होणार आहेत.

हवामान

पुणे आणि परिसरात आज कमाल 38 तर किमान 20 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमान साधारण असेच राहणार असून आकाश निरभ्र असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमधे. नमस्कार.**